'माणुसकी... पक्ष्यांची..!!!

'एकदम झक्कास झालाय हं चहा ! तुझ्या हातचा चहा म्हणजे जणु स्वर्गीय सुख !!
पण काय गं... एक विचारु का ?
नाही ....म्हटलं, तुम्हा बायकांना जरा जास्तच कळतं आम्हा पुरुषांपेक्षा !
'छे बाई ! तुमचं आपलं भलतंच हं काहीतरी ! विचारा काय विचारायचं ते लवकर,खुप कामं पडलीत माझी ! '

' काय गं, तुला काय वाटतं गं ,माणसांना छळणाऱ्या या कोरोना आजाराबद्दल ? माणसांचं जगणं किती कठीणं केलंय त्याने !' चिमणा पेपर वाचता वाचता चहाचा घोट घेत चिमणीला म्हणाला.
चिमणी म्हणाली,'काय सांगावं बाई, मला तर काही कळतचं नाही! खरं तर मीच याविषयावर तुमच्याशी बोलणार होते , बरं झलं तुम्हीच विषय काढला ते ! बिचारी सारी माणसं , बायका , मुलं म्हातारी माणसं घरात बंदिस्त अन आपण असं रस्त्यावर छान उडतोय , बागडतोय , हवं तिथे जातो ! काय वेळ आलीय बघा या माणसांवर !
आपल्या जिद्दीने, बुद्धीने काहीच अशक्य नसलेल्या माणसांनी कधीही असा विचार केला नसेल की आपल्यावर अशी वेळ येईल !
रस्त्यावर फिरणारी माणसं पाहुन आपल्याला कोण आनंद होत असे ! तुम्ही काहीही म्हणा, पण आपल्याला देखील या माणसांचा भलता लळा लागला होता ,नाही का !
तसेही इतर पक्ष्यांमध्ये आपण या माणसांचे जरा जास्तच लाडके!
कुणी आपल्यासाठी खायला दाणे टाकुन ठेवायचे.. तर कुणी पिण्यासाठी पाणी भरुन ठेवायचे ! आपल्याला कधी कुणी हुसकुन लावलं नाही .'
चिमणा म्हणाला ,'हो ना गं,इतर समजतात तसं ,तितकाही माणुस काही वाईट नाही बरं... त्याचा चांगुलपणा कित्येकदा पाहिलायं ना आपण !
हो मान्य आहे .. त्याच्या हातुन बऱ्याच चुका झाल्यात , नाही असं नाही. त्याने सृष्टीचक्र बिघडवण्याचाव गुन्हा केलाय .त्याच्या प्रगतीपायी आपल्याही कित्येक बाधंवांना आपले प्राण गमवावे लागलेत .पण आता माणसाला या सर्व गोष्टींची झालीच असेल जाणीव या जीवघेण्या कोरोनामुळे ! यातुन त्याच्यातला चांगुलपणा कदाचित पुन्हा नव्याने जन्म घेईन अन फुलु लागेल !
शिकेल तो नक्कीचं यातुन चांगलं ! '
अशा दोघांच्या गप्पा रंगलेल्या असतात . चिमणा तिला म्हणतो, ' अगं ए ,ऐक ना !.. आज काहीतरी चमचमीत कर ना गं खायला ! रोजचं तेच तेच खाऊन कंटाळा आलाय .शिवाय घरात एवढे मुबलक दाणे सुद्धा पडलेत !
चिमणी म्हणते... तुमचं आपलं काहीतरी भलतचं असतं !
अहो , घरात दाणे पडलेत म्हणुन काय ,उगाच गरज नसताना चमचमीत पदार्थ बनवुन खायचं .गरज आणि हौसमौज ह्या दोन्हीही वेगळ्या गोष्टी आहेत मिस्टर ! गरजा आपण टाळु शकत नाही पण हौसमौज करणं टाळु शकतो.
छे बाई! मला तर अजिबात पटतं नाहीय तुम्ही म्हणता ते... शिवाय उद्याचा पण काही विचार हवा की नको !
अजुन पिलं मोठी व्हायची आहेत.
आज जरी सगळं मिळत असलं तरी ते किती दिवस पुरणार?
अन ज्या शेतीच्या अन शेतकऱ्याच्या भरवशावर अख्ख जग पोटावरुन तृप्ततेनं हात फिरवतंय त्या शेतीचा या अशा बदलत्या मिसर्गचक्रापुढे काय भरवसा ? अहो,पिकलंच नाही तर सगळे खाणार कुठुन ? त्यामुळे जे आहे ते सांभाळुनच वापरावं लागेल यापुढे आपल्या सर्वांना !
मिळतयं त्याची अशी उतमात करणं योग्य नव्हे !
बघा ना ,आज कितीतरी माणसांच्या घरी चुलंही पेटत नाही ,कितीतरी जण उपाशीपोटी झोपतायंत . तर कित्येक जण भुकेने मरतदेखील आहेत . तुम्हाला आठवतं काही दिवसापूर्वी आपण अन्नाच्या शोधात गावामध्ये जायचो तेथे अक कुटुंब तर आपल्याला दाणे दिल्यानंतरच जेवत असत . काही कारणाने आपल्याला उशीर झाला तर कुणीतरी आपल्यासाठी ताटकळत असायचं.आज आपल्याला सहज मिळतं म्हणुन त्या माणसांवर आलेल्या ह्या संकटात आपण अशी मजा करायची ! नाही नाही ,इतकं स्वार्थी मला नाही बाई होता येणार !!

चिमणा म्हणाला,' हो गं अगदी खरंय तुझं !
मी तर ह्या गोष्टीचा गांभीर्याने कधी विचारच केला नव्हता बघ !
तुम्ही बायका किती योग्य विचार करता हे पटलं मला, खरंच ग्रेट आहेस तु !
ठरलं तर ! आजपासुन सगळी हौसमौज बाजुला ठेवुन आपण देखील अत्यंत काटकसरीने वागुया. !
पुरे झालं हं कौतुक बायकोचं ! एवढी काही मी महान नाही आहे.
चिमणी लाजत म्हणाली.
'जा आंघोळ उरकुन घ्या आता .' असे म्हणत ती कामाला लागली .
तितक्यात चिमणा चिमणीला लहान बाळांचा जोरजोरात रडण्याचा आवाज ऐकु आला .चिमणा म्हणाला ,'काय गं ,पिलं नीट झोपली आहेत ना ?की उठुन रडतायतं ? त्या दिवशी तुझ्या हलगर्जीपणामुळे एक पिलु पडता पडता वाचलं ,तु आहेस जरा विसरभोळी, वेंधळी! नशीब ! मी घरीच होतो तेव्हा , म्हणुन निभावलं.कामाच्या नादात तुला लक्षात राहत नाही बरेचदा.'
चिमणी गाल फुगवुन म्हणाली ,
' माझं मेलीचं कुणाला कौतुकचं नाही. सकाळी उठल्यापासुन राब राब राबते , पिलांचं सारं काही हवं नको ते बघते,खोप्याची साफसफाई,तुमचं जेवणंखाणं सारं सारं करते !' हे बघायला तुम्ही असता तरी कुठे घरी ?अन तरीही वेंधळी कोण ? तर मी च !
"चिमणा हसुन म्हणाला,'अगं गंमत केली जराशी !त्यात काय बिघडलं ! तु हे सारं करतेस म्हणुन तर मी बाहेर मनसोक्त फिरुन घरासाठी ,पिलांसाठी चार दाणे मागे टाकु शकतो!
केवढा भक्कम आधार आहे तुझा! '
चिमणी म्हणाली, पुरे झालं हं कौतुक ! तुमच्या अशा गोड बोलण्यालाच आमची बायकांची जात फसते नेहमी !
बरं मी काय म्हणते.. मी जरा स्वयंपाकाचं बघते. नंतर पिलांना भरवते .
तोवर तुम्ही एक काम करा ..
ती समोरची ' माऊली 'सोसायटी आहे न , तिथे दोन लहान बाळं आहेत आपल्या पिलांसारखी ! मी आपल्या पिलांना घेऊन बरेचदा जाते तिथे .फार रमतात पिलं तिथे. फार चांगली माणसं राहतात तिथे .पण आता मात्र या कोरोनामुळे सर्वत्र लॉकडाऊन असल्याने त्यांना कुणालाच घराबाहेर पडता येत नाही .त्यामुळे ही छोटी बाळं फार रडतातं. चिडचिडही करतात हल्ली.
मघाशी तुम्ही रडण्याचा आवाज ऐकला ना तो या बाळांचाच !
तुम्ही जरा त्यांच्या खिडकीत जाऊन चिवचिव करा, तुमच्या आवाजाने ती नक्की शांत होतील .
शेवटी काहीही असो , माणसांवर आलेल्या या संकटात आपल्याकडुन त्यांना होईल ती मदत आपण करायलाच हवी . नाही का !
आपण सारी एकाच आईची लेकरे आहोत !
अन ही आई प्रत्येक लेकरांवर सारखंच प्रेम करते . तिला साऱ्यांनाच सुखी पाहायच असते.आपले हे बांधव सुखी तर आपण सुखी. !
जा जाऊन या जरा लगेच ! '
' जैसा हुकुम मेरे सरकार ' म्हणत चिमणा तिकडे उडुन गेला. तोपर्यंत चिमणीने घरातली कामे उरकली ,स्वयंपाक उरकला,पिलांना भरवलं अन चिमण्याची वाट पाहत बसली.
खोप्याच्या दारावर झालेल्या टकटक आवाजाने ती दचकली... दार उघडुन पाहते तो काय.. चिमणा चोचवभरुन दाणे घेऊन आला होता आणि जरा दम घेऊन चिमणीला सांगु लागला की ,त्याला पाहुन ती बाळे लगेचच रडायची थांबली , त्याच्यासोबत खुप खेळलीदेखील.! त्यांच्या आईने खुश होऊन त्याला भरपुर दाणे दिले. चिमणी म्हणाली ,' अरे वा ! छान ! दुसऱ्यांच्या पडत्या काळात , दु:खी प्रसंगात त्यांना केलेली मदत हीच खरी सेवा आहे .चला , आता जेवुन घ्या.आणि जरा आराम करा .मग मलाही जरा बाजुच्या एका सोसायटीत जायचं आहे . तिथे एक सर्व दृष्टीने समृद्ध असलेलं म्हातारं जोडपं राहते . पिलं बाहेर खेळतात तेव्हा मी नेहमीच तेथे जाते . मी गेल्यानंतर त्यांना घरचंच कुणीतरी आल्यासारखं वाटतं. ते माझ्याशी हितगुजं करतात .मला मनातलं सांगतात.

एवढंच काय तर कधीकधी छोट्याशा कारणावरुन आपसात भांडतातदेखील .तेव्हा त्यांची लटकी  भांडणंही मीचं सोडवते. दोघांकडे आळीपाळीनं चिवचिवत बघते की मिटलीच भांडणं समजा !पण आता या लॉकडाऊनमध्ये ते दोघेही एकाकी पडलेतं ! त्यांचं हे एकाकीपण थोडतरी कमी करण्यासाठी आता मला जायलाचं हवं . मी जाऊन येते,मला जरा उशीर होईल .तोवर तुम्ही पिलांकडे लक्ष द्या,उरलेली कामं आवरुन ठेवा ! आणि हो ... जरा जमलं तर स्वयंपाकाचंही आवरुन ठेवा !
मान्य आहे आपल्याकडे हे कोरोना ,लॉकडॉऊन असं काही नाही.... पण तिकडचे पुरुष बघा कसे घरकामात ,स्वयंपाकात छान तरबेज झालेत ! शिका जरा त्यांच्यापासुन काही!!
काय तर म्हणे,मी विसरभोळी, वेंधळी !
बघुया आता तुम्ही किती हुशार आहात ते! असे म्हणतं गालातल्या गालात हसत चिमण्याकडे एक प्रेमळ कटाक्ष टाकत चिमणी चिवचिवत उडुन गेली.... अन चिमणा मात्र गाणे गुणगुणत  नसलेला पदर कमरेला खोचुन घरातील कामात गढुन गेला !!

वर्षा राहुल महाकाळ
तारापुर , बोईसर
१४/८/२०